भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०४/२०१८

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०३/०२/२०१८ चे १३.१४ वाजता. दरम्यान फिर्यादीचे मुलीची भाची वय १५ वर्ष, ८ महिने हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीचे कायदेशीर ताब्यातुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. आत्राम पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) घरातील नगदी पैश्याची चोरी :–**

दिंनाक ०३+०४/०४/२०१८ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती अंजना महादेव आवारी वय ६५ वर्ष, रा. गोसे खुर्द हिचे घराचे समोरील दाराची कुलुप उघडुन घरात प्रवेश करुन टिनाचे पेटीतील नगदी १६,०००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) रिलायंस जिओ कम्पनीचे टावर वरील तांब्याचे वायर चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक १८/०२/२०१८ चे १५.०० ते ०२/०३/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन रिलायंस जिओ कम्पनीचे टावर वरील तांब्याचे ४५ मिटर लांबीचे वायर किंमती ७०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सतिश शामराव कावळे वय ३२ वर्ष, रा. शास्त्री वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. आत्राम पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) ताब्याचा तारेची चोरी :–**

दिंनाक ०४/०४/२०१८ चे ००.३० ते ११.०० वाजता. दरम्यान यातील आयुध निर्माण फॅक्टरीचे सायडींगला वरती व्यवस्थित लावलेला तांबा तार ४५ किलो ग्रॅम किंमती १५,०००/–रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी पुरुषोत्तम समयलाल पाल वय ३८ वर्ष, रा. तुमसर रोड आवास रेल्वे कॉलोनी तुमसर रोड यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०४/०४/२०१८ चे ०७.३० ते ०९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले मुला सह स्वतःचे घरी राहत असुन नमुद आरोपीतांचे घर सुध्दा फिर्यादीचे घराला लागुन असुन यातील आरोपीने फिर्यादीचे घरासमोरील झाडाचे पाने आमच्या घराकडे का आले, म्हणुन भांडण करुन आरोपी क्र. १ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ हीने दिवस भर कोर्टात जाते लोकांना उरावर बसवते अशा अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीस लज्जा पोहचेल, अशा प्रकारे हातवारे केल्याचे फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १९.०० ते २०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही तिच्या घरासमोरील रोडवर सार्वजनीक ठिकाणी हजर असतांना यातील आरोपीने त्याचे मुलीस फिर्यादीने बिगडविले व पळुन जाण्यास मदत केल्याचे संशयावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**७) खाटेवरुन खाली पाडुन ईलेक्ट्रीक पोल डोक्याला मार लागुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०३/०४/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती सरस्वता महादेव शहारे वय ६५ वर्ष,रा. वासेळा ही आपले घरी खाटेवर बसली असता यातील आरोपी हा तिचा व तिचे बहीनीचा नाव घेवुन शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीला तु माझे बहीनीला शिवीगाळ करुन नको असे हटकले, असता आरोपी याने तिचे जवळ जावुन तिला खाटेसहीत खाली पाडल्याने अंगणात असलेल्या ईलेक्ट्रीक सिमेंट पोल फिर्यादीचे डोक्याला मागील बाजुस लागुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) क्षुल्लक कारणावरुन लाकडी पाटीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ३१/०३/२०१८ चे २१.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सौ. प्रियंका मंगेश शहारे वय २६ वर्ष, रा. पालांदुर ही घरी हजर असतांनी यातील आरोपी पती हा गावातुन दारु पिवुन घरी आला व पोराच्या नवसाच्या कार्यक्रमाला तुझ्या भाटव्याचे पैसे का लावले असे बोलुन भांडण व शिवीगाळ करुन घराचे समोरील टाक्यावर असलेल्या लाकडी पाटीने फिर्यादीचे उजवे बाजुला कपाळाचे वर डोक्यावर मारुन जखमी केले व थापड बुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**९) क्षुल्लक कारणावरुन लाकडी बॅटने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ०४/०४/२०१८ चे १०.००ते ११.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीने आरोपी यास म्हटले की तु शेळया का आणल्या, असे हटकले असता आरोपीने फिर्यादीस तुझ्या शेळया नाही तु येथे कशाला आलास! असे म्हणुन शिवीगाळ केली व उजव्या हाताचे खांदयावर लाकडी बॅटने मारुन जखमी केल्याने जखमी फिर्यादी सुरेद्र तोताराम तिरपुडे वय ४४ वर्ष, रा. टेकेपार डोडमाझरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**१०) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक ०४/०४/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक अशोक बाबुराव चुटे वय ५० वर्ष, रा. बाचेवाडी याने दारु पाणी पिवुन दारुचे नशेत राकेट नावाचे विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचाराकरीता त्याचे मुलाने सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चाबुकस्वार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०४/२०१८ चे ११.५० ते १२.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन ही दिघोरी टी पाईट येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. आगासे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पो.स्टे. दिघोरी करीत आहेत.

**१२) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन करडी, तुमसर, अडयाळ व दिघोरी येथे अवैध हातभट्टी व देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३४ लिटर हातभंट्टी दारू+ ३० किलो सडवा + साहित्य  किमती ४९००/रु. व ३ लिटर ६०० देशी दारु किंमती १०४०/–रु. असा एकुण ५९४०/–रु.  चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली  एकुण  १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०५ तीन सिटर वाहनाकरीता ०५ ईतर वाहनांवरती – ९५ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. माया चोटसे)**
**महिला सेल भंडारा**
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता